# NUTA BULLETIN

OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION

Regd. No. MAHBIL/2001/4448 : Postal Registration No. AMT/RNP/78/2024-2026

YEAR : 50 ) 15th March 2025 ( No. of Pages 08 ) ( No : 06


## *MINUTES*

**of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS'ASSOCIATION held at 12.00 noon on *SUNDAY, the* *2nd March, 2025 at***

***SHRI BHAYYAJI PANDHARIPANDE NATIONAL INSTITUTE OF SOCIAL WORK HANUMAN NAGAR, NAGPUR***

General Body of Nagpur University Teachers' Association met at 12.00 noon on Sunday, 2nd March, 2025 at Shri Bhayyaji Pandharipande National Institute of Social Work Hanuman Nagar, Nagpur. Prof. P.B. Raghuwanshi President was in the chair. The membership numbers of the members present at the meeting are as follows :-

0048, 0058, 1122, 1177, 1495, 3277, 3341, 3432, 3550, 3573, 3594, 3595, 3631, 3750, 3785, 3835, 4036, 4045, 4097, 4108, 4189, 4246, 4262, 4335, 4340, 4411, 4613, 4807, 4808, 4899, 4953, 5085, 5104, 5169, 5187, 5237, 5240, 5283, 5307, 5309, 5312, 5401, 5419, 5420, 5443, 5478, 5588, 5689, 5706, 5733, 5791, 5860, 5915, 6119, 6122.

Signed sheets of papers recording the attendance are included on pages 137 to 141 of and will form part of, the "BOOK OF ATTENDANCE" of General Body meetings.

Agenda of the General Body meeting was circulated on pages 29 to 31 of 2025 NUTA Bulletin.

### ITEM NO. 877 :
### *CONFIRMATION OF MINUTES :*

**CONFIRMED** the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on Sunday, 30th June, 2024 at Bharatiya Mahavidyalaya, Rajapeth, Amravati.

***Notes :- (1)*** *Copy of the minutes was Circulated on pages 141 to 144 of 2024 NUTA Bulletin.* ***(2)*** *Corrections, if any, were invited in the copy of the Minutes of the General Body Meeting of Nagpur University Teachers'Association held at 12.00 noon on SUNDAY, the 30th June, 2024 vide No.CIM/54 Dated 15th July, 2024 published on page 144 of 2024 NUTA Bulletin. No correction was received.*

***विषय क्रमांक ८७७ (१) :***
***प्रा.डॉ.शरद कळणावत यांचे दुःखद निधन***

**प्रा.डॉ.शरद कळणावत यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील माजी मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.शरद कळणावत यांचे दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ज्येष्ठ विचारवंत, संत वाङ्मयाचे गाढे अभ्यासक, भाषा प्रभू साहित्यिक, कामगार व शिक्षक संघटनेचे ते नेते होते. आपल्या शैलीदार वक्तृत्त्वासाठी त्यांची ओळख होती. आक्रमक आणि निर्भीड स्वभावाचे तसेच स्पष्ट वक्ते असलेले डॉ.शरद कळणावत यांनी अमरावती विद्यापीठामध्ये कार्यकारी मंडळ व विद्वतसभा सदस्य, अधिष्ठाता, मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून तसेच नागपूर विद्यापीठात अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या आहेत. 'मराठी वाङ्मयाचा वाचक व त्याची अभिरूची' या विषयावर सन १९८६ साली त्यांना अमरावती विद्यापीठाची पहिली आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली. उच्च शिक्षण क्षेत्रातील महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार त्यांना १९९० साली प्रदान करण्यात आला.

आपल्या अभ्यासपूर्ण आणि टोकदार शैलीमुळे विद्यार्थी प्रिय शिक्षक असलेले डॉ.शरद कळणावत हे नुटा संघटनेचे पहिल्या फळीतील ज्येष्ठ नेते व सक्रीय सदस्य (सदस्य क्र. ६५) आणि महाराष्ट्र प्राध्यापक संघटनेचे आधारस्तंभ होते. नुटा संघटनेच्या बुलेटिनचेही ते अनेक वर्षे संपादक होते. यवतमाळ जिल्ह्यातील पन्नासहून अधिक कामगार संघटनांच्या ट्रेड युनियन कौन्सिलचेही ते अध्यक्ष होते. यवतमाळ शहरातील विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संघटनांशी त्यांचा निकटचा संबंध होता. नगर वाचनालयाचे अध्यक्ष, जिजाऊ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, स्वास्थलाभ अभ्यास वर्गाचे प्रणेते तसेच साप्ताहिक लोकमत, साप्ताहिक युवास्वप्न आणि दैनिक सिंहझेपचे संपादक म्हणून त्यांची पत्रकारितेतही आपला ठसा उमटविला. 'फुटे आसवांना डोळा', 'पापण्यांनी अडवावे आकाश' व 'जनता बेपत्ता आहे' ही त्यांनी लिहिलेली पुस्तके आहेत. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (२) :***
***प्रा.प्रमोद सोवनी यांचे दुःखद निधन***

**प्रा.प्रमोद सोवनी यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.अनिल ढगे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

प्रा.प्रमोद पांडूरंग सोवनी यांचे ३१ जानेवारी २०२५ ला नागपूर येथे वयाच्या सुमारे ८० व्या वर्षी दुःखद निधन झाले. प्रा.सोवनी नागपूर येथील सी.पी. ॲन्ड बेरार महाविद्यालयात वाणिज्य विषयाचे प्राध्यापक व काही काळ उपप्राचार्य पदावरही कार्यरत होते. ते विवेकनिष्ठ व समाजातील घडामोडीविषयी अत्यंत सजग होते. प्रा.सोवनी मराठी भाषेच्या वापरासंबंधी अतिशय आग्रही होते. एखादा विचार पटला की, त्या विचाराच्या पाठपुराव्यासाठी ते स्वतःला झोकून देत असत. आपल्या व्यावसायिक जीवनातील प्रश्नांविषयी सुद्धा ते असेच जागरूक होते. त्यामुळे अगदी सुरुवातीपासून त्यांनी नुटा चळवळीशी स्वतःला जोडून घेतले होते. त्यांचा नुटा आजीव सभासद क्रमांक १२९ होता. काही काळ ते नागपूर शहर नुटा युनिटचे सचिव सुद्धा होते.

१९८७ मध्ये एमफुक्टोच्या नेतृत्त्वात देशभर चौथ्या वेतन आयोगासाठी कामबंद आंदोलन झाले. ३०-३१ दिवसाच्या या आंदोलनानंतर राज्याने आयोगाच्या शिफारशी मान्य कराव्या यासाठी आणखी २० दिवस आंदोलन करावे लागले. मात्र त्यानंतरही या शिफारशी लागू करतांना राज्य सरकारने त्या निमित्ताने शिक्षकांचा कार्यभार वाढविण्याचा विकृत प्रयत्न केला. त्यामुळे १२ डिसेंबर १९८८ पासून एमफुक्टोला पुन्हा एकदा आंदोलन करावे लागले. शासनाच्या खोट्या प्रचाराला एमफुक्टो व नुटाने सडेतोड उत्तर देण्याचे ठरवून १३ डिसेंबर ते २३ डिसेंबर १९८८ या विधानमंडळ अधिवेशन काळात दररोज एक याप्रमाणे सलग ९ विशेष बुलेटीन्स प्रसिद्ध करून शासनाचा डाव उधळून लावला. प्रा.सोवनी यांनी कृती समितीच्या सहकार्याने हे बुलेटीन्स छापून तयार करून सर्व आमदार व वृत्तपत्रांपर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य अत्यंत सक्षमपणे पार पाडले हे या ठिकाणी नमूद केले पाहिजे. प्रा.सोवनी यांच्या संघटनेच्या कार्यातील योगदानाबद्दल ज्येष्ठ कार्यकर्ता म्हणून त्यांचा नुटाच्या दिक्षांत सभागृहातील सुवर्ण महोत्सव समारोप समारंभात दि. १६ मार्च २०१४ रोजी सत्कार करण्यात आला होता. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (३) :***
***प्रा.एन.एच.व्यास यांचे दुःखद निधन***

**प्रा.एन.एच.व्यास यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.आशिष राऊत यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोला येथील ज्येष्ठ प्राध्यापक स्व.एन.एच.व्यास (सदस्य क्र. ११९५) यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. प्रा.व्यास हे श्री शिवाजी महाविद्यालयात महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या काळापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांनी महाविद्यालयात ३५ वर्षे आपली सेवा दिलेली आहे. ते एक उत्कृष्ट, अभ्यासू व विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. वाणिज्य शाखेचे तज्ज्ञ प्राध्यापक म्हणून त्यांचा लौकिक होता. तसेच त्यांनी वाणिज्य विभागाचे विभागप्रमुख व उपप्राचार्य म्हणून कार्य केलेले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक प्राध्यापकांनी व विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी संपादन केलेली आहे. संघटनेचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय प्राचार्य डॅडी देशमुख यांचे ते

अतिशय विश्वासू व जवळचे सहकारी होते. महाविद्यालयात आयोजित होणारे अनेक शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाच्या जबाबदाऱ्या अतिशय विश्वासाने स्वर्गीय डॅडी देशमुख त्यांच्यावर टाकीत असत. महाविद्यालयाच्या विकास समितीवर प्राध्यापक म्हणून कार्यरत असताना व सेवानिवृत्त झाल्यावरही त्यांनी अनेक वर्षे कार्य केलेले आहे.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात विद्यापीठाच्या अनेक समित्यांवर सुद्धा त्यांनी अनेक वर्षे उत्कृष्टपणे कार्य केलेले आहे. तसेच विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेच्या अभ्यास मंडळावर अभ्यास मंडळाचे सदस्य व अध्यक्ष म्हणून सुद्धा त्यांनी कार्य केले आहे. त्यांच्या निधनामुळे अकोला जिल्ह्यातील वाणिज्य विषयाचा एक उत्कृष्ट अभ्यासक, तज्ज्ञ व अनेक विद्यार्थी व प्राध्यापक यांना मार्गदर्शन करणारा व्यक्ती काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (४) :***
***प्रा.डॉ.यशवंत पी. देशपांडे यांचे दुःखद निधन***

**प्रा.डॉ.यशवंत पी. देशपांडे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.आर.बी.भांडवलकर यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील इंग्रजी विषयाचे सेवानिवृत्त माजी विभाग प्रमुख प्रा.डॉ.वाय.पी.देशपांडे यांचे दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी हृदयविकाराने दुःखद निधन झाले. अतिशय शांत व संयमी स्वभाव असलेले डॉ.देशपांडे हे पीएच.डी. चे मार्गदर्शक होते. ते नुटा संघटनेचे सक्रिय सदस्य होते. (सदस्य क्र. १५४०) त्यांनी काही काळ इंदिरा गांधी महाविद्यालय, राळेगांव जि.यवतमाळ येथे प्राचार्य म्हणून कार्य केले. त्यांची Indian Novelist in English आणि १९७६ कथासंग्रह ही पुस्तके प्रकाशित झाली आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (५) :***
***प्रा.डॉ.जीवन पवार यांचे दुःखद निधन***

**प्रा.डॉ.जीवन पवार यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.आशिष राऊत यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील प्रा.डॉ.जीवन पवार (सदस्य क्र. ३६०९) यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी मेंदूच्या कर्करोगामुळे अतिशय उमेदीच्या काळात दुःखद निधन झाले. ते महाविद्यालयात राज्यशास्त्राचे प्राध्यापक व विभाग प्रमुख होते. स्वभावाने ते अतिशय शांत व सुस्वभावी असे व्यक्ति होते. विद्यार्थीप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांचा महाविद्यालयात लौकिक होता. तसेच महाविद्यालयात सर्व प्राध्यापकांसोबत त्यांचे अतिशय सलोख्याचे व प्रेमाचे संबंध होते. ते राज्यशास्त्रातील आचार्य पदवीचे मार्गदर्शक तसेच महाविद्यालयातील पंडित जवाहरलाल नेहरू अभ्यास केंद्राचे संचालक होते. या अभ्यास केंद्रामार्फत त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संमलेनाचे आयोजन केले. तसेच विद्यापीठाच्या अभ्यास मंडळावर व विद्वत परिषदेवर सुद्धा त्यांनी कार्य केले आहे. त्यांच्या

*DTF Press Release*

## U-turn on NPS, however, the Unified Pension Scheme is not close to OPS; demand for OPS should be strengthened

The electoral setback to the ruling dispensation and the rising tide of mobilisation of public employees has compelled it to introduce a Unified Pension Scheme (UPS) that is a curious hybrid.

The ruling dispensation is claiming that the UPS is almost a return to the Old Pension Scheme (OPS) with a defined benefit in terms of assured pension. **However, the fine print as available at present shows there is a fundamental contradiction in the UPS:** it is claiming to offer a defined benefit on the basis of a contributory scheme.

**The OPS was a defined benefit but non-contributory scheme.** In other words, the entire contribution of the employee was returned with compound interest tax free. In addition, the monthly pension was equal to half of last drawn basic pay plus dearness allowance and funded by the government.

The New Pension Scheme (NPS) was a contributory scheme with no defined benefit. In other words, the employee and the government contributed certain amounts every month. This amount was invested in risky financial assets with uncertain returns. The total amount of the corpus at the time of retirement was divided into two parts. 60% of the corpus was returned to the employee at the time of retirement after deducting tax. The remaining 40% was invested in an annuity scheme and the interest that accrued was paid as pension to the retired employee. The pension under NPS was paltry and well below that in OPS and there was no dearness allowance component in NPS based pension.

**The UPS involves the employee and the government contributing certain amounts every year.** This amount is then invested in assets whose risk profile is unknown.

At the time of retirement the Union Government promises to pay the employee two amounts:

1) The first involves roughly six days equivalent of basic pay and dearness allowance for every year of completed service. For example an employee who completes 25 years of service will get 150 days or 5 months of basic pay and dearness allowance. It is not clear if this amount will be tax free. This will be much less than what the employee gets back as their own contribution at compound interest tax free under OPS. In other words, most of what the employee contributed to the UPS corpus during their service will not be returned back to them.

2) The second amount involves an ostensibly guaranteed pension of 50% of last drawn basic pay. This will be supplemented by dearness relief that is linked to the All India Consumer Price Index for Industrial Workers. What is the guarantee that this re-adjustment of dearness relief will happen at the same frequency for UPS pensioners as re-adjustment of dearness allowance for OPS pensioners?

**Further, unlike the OPS where full pension was available after 20 years of service, in the UPS full pension is available only after serving 25 years** which will adversely impact employees who were compelled to join service late due to the unwillingness of the neoliberal dispensation to undertake timely recruitments.

The fundamental problem with the UPS is that it is supposed to be a fully contributory scheme. If in any year the total pension liability under UPS is more than the interest generated on the existing corpus then there are four possibilities: one, the in service employees under UPS will have to contribute more per month: two, the corpus of UPS will be run down i.e. tomorrow's pension will be sacrificed to pay today's pension; three, the UPS corpus may be redployed towards more risky financial assets which may lead to capital losses i.e. decline in UPS corpus; four, inordinate delays in paying pension and dearness relief to existing pensioners under UPS.

The Union Government with UPS has an inbuilt reason not to announce any more pay commission because that would further the gap between defined benefit and contribution under UPS.

The experience of the Mahatma Gandhi

दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (६) :***
***प्रा.डॉ.अरुण पाचखेडे यांचे दुःखद निधन***

**प्रा.डॉ.अरुण पाचखेडे यांच्या दुःखद निधनाबद्दल डॉ.नरेंद्र शहारे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती येथील माजी प्राध्यापक व वनस्पतीशास्त्र विषयाचे विभाग प्रमुख म्हणून राहिलेले प्रा.डॉ.अरुण उद्धवराव पाचखेडे यांचे दिनांक १८.०२.२०२५ रोजी अचानक दुःखद निधन झाले. सन १९७५ पासून ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयात कार्यरत डॉ.अरुण पाचखेडे सन २०१५ ला सेवानिवृत्त झाले होते. विद्यार्थिप्रिय शिक्षक व मनमिळावू स्वभावाचे डॉ.अरुण पाचखेडे हे नुटा या संघटनेचे आजीवन सदस्य (सदस्य क्र. २३९८) होते. ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालयाच्या नुटा युनिटचे अध्यक्ष म्हणून डॉ.अरुण पाचखेडे यांनी नुटा संघटनेने केलेल्या सर्वच आंदोलनात अतिशय सक्रीय कामगिरी केली. डॉ.अरुण पाचखेडे यांच्या दुःखद निधनाने वनस्पतीशास्त्र विषयाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

***विषय क्रमांक ८७७ (७) :***
***प्रा.डॉ.गजानन अंबादास बिजवे यांचे दुःखद निधन***

**प्रा.डॉ.गजानन अंबादास बिजवे यांच्या दुःखद निधनाबद्दल प्रा.डॉ.काशीनाथ बऱ्हाटे यांनी मांडलेला पुढील शोकप्रस्ताव संमत करण्यात आला. :-**

परतवाडा येथील स्व.छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालयातील सामुदायिक विकास व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.गजानन अंबादास बिजवे यांचे दि. १४ नोव्हेंबर २०२४ रोजी कर्करोगाच्या आजाराने दुःखद निधन झाले. प्रा.डॉ.गजानन अंबादास बिजवे हे नुटाचे आजीव सदस्य (सदस्य क्रमांक ३८६०) होते.

श्री.दादासाहेब तारे शिक्षण संस्था, अचलपूर शहर द्वारा संचालित स्व.छगनलाल मूलजीभाई कढी कला महाविद्यालय, परतवाडा येथे सरांनी प्रदीर्घ काळ अध्यापनाचे कार्य केले. त्यांनी महाविद्यालयातील यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्राचे संयोजक म्हणून अनेक वर्षे कार्य केले. एक विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून त्यांची ख्याती होती. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ, विद्याशाखा आणि इतर प्राधिकारिणींवर त्यांनी कार्य केलेले आहे. नुटा संघटनेच्या अनेक आंदोलनांमध्ये त्यांचा सक्रीय सहभाग राहिलेला आहे. त्यांच्या दुःखद निधनाबद्दल ही सभा तीव्र शोकसंवेदना व्यक्त करीत आहे.

**सभेने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगत सदस्यांना आपली आदरांजली वाहिली.** संमत केलेल्या शोकप्रस्तावाची प्रत संघटनेच्या वतीने सचिव शोकाकुल कुटुंबियांकडे पाठवितील असे सभाध्यक्षांनी सांगितले.

## ITEM NO. 878 :
## *APPROVAL TO THE AUDITED STATEMENTS :*

**CONSIDERED** and **APPROVED** the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the year ended on 31st March, 2024.

***Notes** : **(i)** The copy of the Audited Balance Sheet and Income and Expenditure Account of the Association for the said Financial year was circulated on page 30 & 31 of 2025 NUTA Bulletin. **(ii)** The Audited Balance Sheet and Income and Expenditure Account were placed before the General Body by Dr. Dilip Hande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 879 :
## *STATEMENT ON FIXED SECURITIES POSITION :*

**NOTED** the Statement no. 35 showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2024.

***Note : (i)** Statement no. 35 regarding the fixed securities of the Association as on 31st March, 2024 was circulated on page 32 of 2025 NUTA Bulletin. **(ii)** The Statement showing the position of the Fixed Securities of the Association as on 31st March, 2024, were placed before the General Body by Dr.Dilip V. Hande, Treasurer, on behalf of the Executive Committee.*

## ITEM NO. 880 :
## *APPOINTMENT OF THE AUDITORS :*

**CONSIDERED AND APPROVED** the following resolution for the appointment of Auditors for the Financial year ending on 31st March, 2025 namely :-

**"C.R.Sagdeo & Co. Chartered Accountant "Prabha Niwas" Nagpur be appointed as auditor for the Financial year ending on the 31st March 2025"**

***Notes : (i)** As per Article VII of the Constitution of NUTA the "General Body shall appoint auditors annually in the Annual Meeting of the Association." **(ii)** The Executive Committee resolved to recommend the above resolution, (Vide item No. 04 of 2025) which was placed before the General Body for its approval. **(iii)** Dr. Dilip Hande Treasurer, on behalf of the Executive Committee, moved the resolution.*

**विषय क्रमांक ८८१ :**
***महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित केलेला शासननिर्णय***

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य महाविद्यालय (बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम) हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित केलेल्या शासननिर्णयाची **नोंद घेण्यात आली.**

*टीप : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीतील समाजकार्य*

---

National Rural Employment Guarantee Scheme shows how even a legally guaranteed scheme can be underfunded. The neoliberal dispensation, therefore, has a ready playbook to try and hoodwink employees and influence the outcome of some forthcoming elections (in Haryana, Maharashtra and Bihar) and diffuse the resistance to its anti people policies.

A further matter of concern is that the UPS, even as it is, only involves Union Government employees but does not involve teachers and others who are working in autonomous public organisations.

Further, the ruling dispensation disingenuously claims that **state governments can opt for the UPS but with their own funds!** This after the Union Government, especially since 2014, has squeezed the finances of the state governments.

**The only legitimate alternative to NPS is the OPS.** Neoliberal ideologues deviously claim that the OPS will place an excessive fiscal burden on the government and lead to cut in public services to those who are not covered by OPS i.e. the working poor and private sector employees. In fact part of the OPS based expenditure by the government will return to the government as direct and indirect taxes. The rest is most likely to be spent by OPS pensioners leading to a rise in output, employment and investment. This would further increase tax revenue. That part of the OPS based expenditure that is not covered by this induced higher tax revenue can be covered by a few taxes that only target the super rich namely billionaires and multi-millionaires such as a progressive wealth tax, a progressive inheritance tax and a progressive tax on profits.

**The charade propagated by the ruling dispensation about the UPS almost being a replacement for the OPS is precisely aimed to prevent a public debate about taxation of the super rich while hopefully providing it political succour in forthcoming elections.**

**The teachers' collective must work in concert with unions of government employees and demand through a determined struggle that all teachers and employees must be covered by OPS and for the eighth pay commission.**

**Rajib Ray** — President
**Abha Dev Habib** — Secretary

*महाविद्यालय (बीएसडब्ल्यू/एमएसडब्ल्यू अभ्यासक्रम) हा विषय उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २९ फेब्रुवारी, २०२४ रोजी निर्गमित केलेला शासननिर्णय सन २०२४ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ८८ वर प्रसृत केलेला आहे.*

## ITEM NO. 882 :
## *HIGH COURT ORDER IN W.P.NO. 4618 OF 2021 :*

**NOTED** the High Court Order of Nagpur Bench dated 7th January 2025 in W.P.No. 4618 of 2021 about Ph.D./ M.Phil increment.

***NOTE :*** *The High Court Order of Nagpur Bench dated 7th January 2025 in W.P.No. 4618 of 2021 about Ph.D./M.Phil increment is circulated on page 31 of 2025 NUTA Bulletin.*

## विषय क्रमांक ८८३ :
## *निवडणूक रोखे विशेषांक*

मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक रोख्यांच्या बाबतीत दिनांक १५ फेब्रुवारी २०२४ रोजी दिलेला निर्णय शब्दशः व पूर्ण समाविष्ट असलेल्या, निवडणूक रोखे विशेषांकाची (सन २०२४ चा नुटा बुलेटीनचा अंक क्रमांक ७, पृष्ठ ९७ ते १३२) नोंद घेण्यात आली. नुटा बुलेटीनच्या "निवडणूक रोखे विशेषांका"चे वितरण आज आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## विषय क्रमांक ८८४ :
## *उच्च शिक्षण विभागाच्या भारतीय संविधान विरोधी वर्तनाचा निषेध*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या तर्फे सर्व घटक संघटनांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या, उच्च शिक्षण विभागाच्या भारतीय संविधान विरोधी वर्तनाच्या निषेध विशेषांकाची (सन २०२४ चा नुटा बुलेटीनचा अंक क्रमांक १३, पृष्ठ १८१ ते २०४) नोंद घेण्यात आली. नुटा बुलेटीनच्या "उच्च शिक्षण विभागाच्या भारतीय संविधान विरोधी वर्तनाचा निषेध विशेषांका"चे वितरण आज आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## विषय क्रमांक ८८५ :
## *सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध विशेषांक*

महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या निर्णयानुसार व महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या तर्फे सर्व घटक संघटनांच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या, सुधारित निवृत्तिवेतन योजना निषेध विशेषांकाची (सन २०२४ चा नुटा बुलेटीनचा अंक क्रमांक १४, पृष्ठ २०५ ते २५६) नोंद घेण्यात आली. नुटा बुलेटीनच्या "सुधारित निवृत्तिवेतन

# All India Trade Union Congress

**Unified Pension Scheme (UPS) decided by the Modi Government for Central Government Employees is nothing but an extension of the existing NPS. Government Employees have to continue to contribute 10% of their wages in UPS also. UPS will have lot of aberrations once implemented. AITUC reiterate its stand to continue to fight for Restoring back the NonContributory Old Pension Scheme. AITUC Calls upon the Central and State Government Employees to carry forward their movement for achieving their Pension Rights.**

**Changing of name of places and schemes is the character of the present Government without any benefit to the People or the Nation, which is reflected once again yesterday when the Narendra Modi Cabinet took a decision to retain the NPS in its present shape and to introduce one more contributory Pension Scheme in the name of Unified Pension Scheme (UPS).** The Government employees for the past 20 years are relentlessly fighting against the market based Contributory Pension Scheme called NPS. Due to the pressure built up by the Central Government Employees through their united struggles the Government appointed a high level committee Chaired by the then Finance Secretary T V Somanathan for making recommendations for improvement in the NPS. The Government Employees Organization have been categorical to the NPS improvement committee that no improvement in the NPS is going to match with the Non-Contributory Defined and Guarantee Old Pension Scheme with many protections and supplementary Family Pension and hence the same should be restored back.

The T V Somanathan Committee worked under its mandate and submitted its recommendations not to restore the Old Pension Scheme but to introduce another Contributory Pension Scheme which was never the demand of Government Employees. Yesterday (24.08.2024) the Cabinet considered the recommendations of the T V Somanathan Committee and came out with a big announcement with lot of unfair that Government has taken care of the interest of more than 25 Lakhs Central Government Employees. **The fact remains that the Central Government Employees and State Government Employees by and large are not happy with the new UPS, since it is nothing but an extension of NPS. One of the worst decision is the Full Pension period is increased to 25 years which is at present 10 years under the Old Pension Scheme. Minimum Pension is declared as Rs.10,000/- Whereas the Minimum Family Pension is decreased to Rs.6,000/-. There are many protections for the Pensioners in the Old Pension Scheme, such as 40% Commutation of Pension in advance, Restoration of the Commuted Portion of Pension after 15 years, 20% addition Pension after 80 years of age and their after the Pension is increased in every 5years. Pension and Family Pension are revised after Pay Commission in Old Pension Scheme, whereas no such provision is there in the UPS. The Market gambling in the UPS will continue to remain. Already more than 6 Lakhs Crores is accumulated with the NPS Fund. The Modi Government wanted to retain this amount in the Market.** If the Modi Government is really concerned about the Old Age protection of the Government Employees, it should have increased its Contribution to 28.5% ie., 18.5% Government Contribution in UPS now announced + 10% of the Employees Contribution and straight away restored the Old Pension Scheme instead of the gimmicks of introducing another Contributory Pension Scheme UPS.

In a nut shell UPS is not going to match the Old Pension Scheme which is basically NonContributory in nature. Already, resentment have started amongst the Central & State Government Employees against the Modi Government decisions to introduce the Contributory UPS. AITUC, reiterates its position to continue the struggle to scrap the NPS and to restore the Non-Contributory Old Pension Scheme. AITUC, as in the past will extend all support and cooperation to the Government employees in all their struggle to achieve their Pension right which is a fundamental right of the Government employees in accordance with various Supreme Court Judgments.

**Amarjeet Kaur**
General Secretary, AITUC
Mob: 9810144958

योजना निषेध विशेषांका"चे वितरण आज आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

## ITEM NO. 886 :
## *AIFUCTO DEMANDS WITHDRAWAL OF UGC DRAFT REGULATION*

**NOTED** the Press Release issued by the President and General Secretary of AIFUCTO demanding the withdrawal of UGC Draft Regulation 2025.

***Note :*** *The Press Release issued by the President and General Secretary of AIFUCTO demanding the withdrawal of UGC Draft Regulation 2025 was circulated on page 32 of 2025 NUTA Bulletin.*

### विषय क्रमांक ८८७ :
### *युजीसी ड्राफ्ट रेग्युलेशन - विशेषांक*

नुटाच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या युजीसी ड्राफ्ट रेग्युलेशन - विशेषांकाची (सन २०२५ चा नुटा बुलेटीनचा अंक क्रमांक ५, पृष्ठ ६१ ते ९२) नोंद घेण्यात आली. नुटा बुलेटीनच्या "युजीसी ड्राफ्ट रेग्युलेशन - विशेषांका"चे वितरण आज आमसभेमध्ये करण्यात आले. सदरहू विशेषांक संघटनेच्या www.nuta.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### *विषय क्रमांक ८८८ :*
### *गणसंख्या :*

नुटाच्या घटनेतील खंड ५ मध्ये असलेल्या तरतुदीनुसार गणसंख्येच्या अभावी सुरुवातीला सभा अर्धा तासासाठी तहकुब करण्यात आली होती, **ही बाब कार्यवृत्तामध्ये नोंदविण्यात येत आहे**, असे अध्यक्षांनी जाहीर केले.

### विषय क्रमांक ८८९ :
### *आभार*

**सभा व्यवस्थेबद्दल आभार** : कार्यकारी मंडळाच्या वतीने अध्यक्षांनी महाविद्यालयाचे प्राचार्य व स्थानिक शाखेचे इतर प्राध्यापक, जिल्हा नुटाचे अध्यक्ष, सचिव व सदस्य, यांनी ही सभा यशस्वी करण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल आणि दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. शेवटी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानून **सभा संपली असे अध्यक्षांनी जाहीर केले.**

स्वा / **प्रा. पी. बी. रघुवंशी**
*अध्यक्ष*

स्वा / **डॉ.नितीन कोंगरे**
*सचिव*

**ALL INDIA FEDERATION OF UNIVERSITY & COLLEGE TEACHERS' ORGANISATIONS**

(Regd. Under Act XXI of 1860)

404, Devkunj Apartment, Road No :- 06, North Patel Nagar (Near Baba Chowk), P.O. :- Keshri Nagar, Patna-800024 :

Mobile : + 91 - 9431617320 /+91 - 9525622524, E-mail :akancphy@gmail.com/aifucto.generalsecretary@gmail. com; Website : www.aifucto.org

## Patna, the 26th February 2025

**Press Release**

**AIFUCTO Demands the withdrawal of the UGC clarification Letter No F.16-1/2023(CU)/ 128114 Date on 10 Feb 2025 for M.Phil and Ph.D Advance increment.**

On February 10, 2025 UGC issued the Clarification for advance increment at entry level of academic and other academic staff. In its clarification it was said, "the university may follow the point 8 of Ministry of Education letter dated 02.11. 2017 wherein it has been clearly described 'the incentive structure is in built in the pay structure itself wherein those having MPhil or Ph.D degree will progress faster under CAS. Therefore, there shall be no incentive in form of advance increments for obtaining the degrees of MPhil or Ph.D. Universities were asked to follow the instructions issue by MoE dated 02.11.2017 to avoid audit objection."

It is evident that UGC refuses any increment for M.Phil or PhD., AIFUCTO strongly condemns the move and at the same time draws attention to another public notice dated December 7, 2018 which once again was a clarification regarding admissibility of advance increments and benefit of number of years required for promotion under CAS for candidates who have enrolled/ registered / completed Ph.D., degree before July 11, 2009. In the notification it is stated the Commission in its meeting held on November 14, 2018 approved that the non-compounded advance increments to such Ph. D degree holders shall be admissible along with benefit of number of years required for promotion, given a few conditions were met.

The UGC Notice of February 10,2025 has clearly overlooked the Notification dated December 7, 2018. Notwithstanding the reason forwarded by UGC about 'the built in the pay structure' that will enable those having MPhil or Ph.D degree to progress faster under CAS' AIFUCTO demands that incentives for MPhil and PhD must continue. That there shall be no longer be any incentive in form of advance increments for obtaining the degrees of MPhil. Or Ph.D., too is not acceptable. Most academics and scholars in India complete MPhil and PhD under dire conditions. The incentives for M.Phil and Ph.D., are recognition of the hard work put in by these teachers and also an encouragement to the younger generation to undertake serious research, the percentage of which has gone down substantially. It takes a minimum of 4 to 6 years to complete Ph.D., and little less to complete MPhil. UGC Draft Regulation 2025 and the policy to discontinue MPhil and Ph.D incentives are attempts to dilute the standard of higher education in India and also deny the minimum benefits to teachers in the 8th Pay Commission in future. This is a new trend developed by the Central government and UGC to withdraw privileges that teachers have achieved over the years through sustained struggle. AIFUCTO disapproves he UGC notification for withdrawing MPhil and PhD advance increment. UGC must withdraw the Notification at the earliest. AIFUCTO leadership will want to meet and discuss the matter with UGC. AIFUCTO is extremely disturbed at the way NEP 2020 has laid out its proposal on higher education and research, scrapping MPhil and eligibility to start research right after completing undergraduate courses. This practice will undermine the quality of research because without the Post graduate degree, no student acquires the expertise on the subject of research. This is a global practice and AIFUCTO has expressed its resentment time and again on this issue. The present Notification is directly related to the policy of central government to discourage research and an outcome of the implementation of NEP 2020.

**Prof. Dr. M. Nagarajan**
**President AIFUCTO**

**Prof.Dr.Arun Kumar**
**General Secretary AIFUCTO**

Email : nagarajanmuta@gmail.com
Mobile number: 9443114403
Email : aifucto.generalsecretary@gmail.com
Mobile No: 8210642139

# अपव्यवहारार्थ स्थळ निर्मिती करीत राहण्याचा उद्योग हाणून पाडणे : २

उपरोक्त मथळ्याचा एक तपशीलवार लेख सन २०२५ च्या नुटा बुलेटीनच्या पृष्ठ ३७ ते ५९ वर प्रकाशित करण्यात आलेला आहे.
त्या लेखामध्ये एकूण ११ सहपत्रे समाविष्ट असून त्या लेखाचा शेवटचा परिच्छेद ८० असा आहे.
परिच्छेद ८० नंतर खालील परिच्छेद जोडण्यात यावेत.

**८१.** सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांनी दिनांक २८ मार्च २००८ रोजी मुंबईहून जे आदेश (सहपत्र १० : परिच्छेद ७८) निर्गमित केले त्याचा अशाच एका व्यथित शिक्षकाला न्याय मिळवितांना मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये चांगलाच उपयोग झाला. उच्च शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांची गेल्या ५-१० वर्षातील वृत्ती लक्षात घेता निरनिराळे शासननिर्णय, त्या शासननिर्णयांचे या अधिकाऱ्यांनी लावलेले अर्थ, गर्भितार्थ व अपव्यवहारकरिता लावलेले गैरअर्थ, अपव्यवहारार्थ स्थळांची मुबलक निर्मिती करण्याचा अधिकाऱ्यांनी केलेला प्रयत्न, त्यावर संघटनांनी घेतलेल्या भूमिका, त्याबाबतीत उच्च न्यायालयात व सर्वोच्च न्यायालयात झालेले निर्णय याबाबत जागरूक राहून परस्परांमध्ये चर्चा करून या सर्व घटनाक्रमाची माहिती घेणे व पुढचा मार्ग काढणे किती आवश्यक झालेले आहे हे सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलेल्या या घटनाक्रमावरून दिसून येते व त्यामुळेच त्याची तपशीलवार माहिती नमूद करीत आहे.

**८२.** श्री.गिरीधर भानुदास पाचडे यांची अधिव्याख्याता म्हणून अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथे दिनांक १६ डिसेंबर १९८९ रोजी नेमणूक झाली. ज्या जागेवर त्यांची नेमणूक झाली ती जागा अनुसूचित जमाती (Schedule Tribe - ST) साठी राखीव होती. पण त्या जमातीतून उमेदवार उपलब्ध न झाल्याने त्यांची नेमणूक करण्यात आली. पुढे सतत सहा वर्षे हा क्रम चालू राहिला. जाहिराती निघत राहिल्या. अनुसूचित जमाती प्रवर्गातून उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे व श्री.पाचडे यांचे काम समाधानकारक असल्यामुळे त्यांची त्या जागेवर नेमणूक होत राहिली. त्यांनी वारंवार हे पद अराखीव करावे म्हणून शासनाकडे विनंती केली. मात्र अनेक दिवसांचा विलंब करूनसुद्धा शासनाने त्याबाबतीत कोणतीही कारवाई केली नाही. शेवटी श्री.पाचडे यांनी सन २०११ मध्ये मुंबई उच्च न्यायालयाच्या मा.नागपूर खंडपीठासमोर याचिका (W.P.No. 3694 of 2011) दाखल केली. या याचिकेमध्ये त्यांनी मुंबई उच्च न्यायालयामध्ये झालेल्या तत्सम प्रकरणावरील एक निर्णय (reported in 2009(3) Mh.L.J. 323 (Harshendu Vinayak Madge Versus Chembur Trombay Education Society, Mumbai & Others). सोबत जोडलेला होता.

**No.CIM/ 55 : : Date 15.03.2025**

## CORRECTION
## in the copy of the Minutes of the General Body Meeting of NUTA

Copy of the Minutes of the General Body Meeting of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION held at 12.00 noon on Sunday, 2nd March, 2025 at Shri Bhayyaji Pandharipande National Institute of Social Work Hanuman Nagar, Nagpur is circulated in this NUTA Bulletin.

If you propose to suggest any correction to the Minutes, it may be pointed out to **Dr.Nitin C. Kongre,** Secretary, NUTA, Plot No. 144, Gayatri Nagar, Behind IT Park, Nagpur-440022 by letter within 10 days from the date of posting of this Bulletin.

It will not be possible for the corrections received after the due date to be included in the List of corrections for consideration. Please send one copy of your letter to Prof. P. B. Raghuwanshi, President NUTA, Buty Plot, Near Mahajan Wadi, Rajapeth, Amravati. 444 601.

**- Dr.Nitin C. Kongre,** ***Secretary***

**८३.** मा.उच्च न्यायालयाने "प्रतिवादींनी प्रा.पाचडे यांच्या निवेदनावर यथोचित निर्णय घ्यावा" असे आदेश पारित केले व याचिका निकाली काढली. त्यांच्या निवेदनामध्ये असलेली "ते धारण करीत असलेले पद अराखीव (de-reserved) करावे व त्याप्रमाणे वेतननिश्चिती करावी" ही त्यांची विनंती प्रतिवादींनी फेटाळून लावली. कोणत्याही कर्मचाऱ्यांनी किंवा शिक्षकांनी थेट न्यायालयात जाऊ नये, प्रथम विद्यापीठाकडे किंवा शासनाकडे दाद मागावी अशा अर्थाचे दिनांक १७ एप्रिल २००१ चे व त्यापूर्वी दिनांक २८ जुलै १९९९ चे शासनाचे परिपत्रक होते. त्याप्रमाणे श्री.पाचडे यांनी वारंवार निवेदने सादर केलीत, पण त्याबाबतीत प्रतिवादींनी कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयामध्ये पुन्हा याचिका (W.P.No. 5450 of 2015) दाखल केली. ही याचिका दिनांक २२ सप्टेंबर २०१६ रोजी निकाली निघाली. या याचिकेमध्ये सुद्धा मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला (reported in 2009(3) Mh.L.J. 323 (Harshendu Vinayak Madge Versus Chembur Trombay Education Society, Mumbai & Others). हा निर्णय मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या लक्षात आणून दिलेला होता. मा.उच्च न्यायालयाने या याचिकेमध्ये "The respondent nos.1 and 3 are directed to fix the salary of the petitioner and pay the arrears of the monetary benefits to the petitioner with effect from 03.07.2008, within four months." असे आदेश पारित केले.

**८४.** वस्तुतः नेमणुकीच्या दिवसापासून म्हणजे १६ डिसेंबर १९८९ पासून त्यांची सेवा धरून त्यांना लाभ देणे आवश्यक होते. पण तसे आदेश झाले नाही. याचिकाकर्ते बऱ्याच विलंबाने न्यायालयात आले या कारणावरून दिनांक ३ जुलै २००८ पासून सेवा धरून लाभ देण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाने दिले त्यामुळे श्री.पाचडे यांना सन २०१७ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात अपील (Civil Appeal No. 957 of 2017) दाखल करावी लागली. या सर्व कालखंडामध्ये श्री.पाचडे हे मूळ लेखामध्ये नमूद केलेल्या सर्व घटनाक्रमावर लक्ष ठेऊन होते असे दिसून येते. मा.सर्वोच्च न्यायालयाचा या प्रकरणातील निर्णय दिनांक ६ मार्च २०१९ रोजी झाला. या निर्णयामध्ये श्री.पाचडे यांनी श्री.संजय खरबडे यांच्या प्रकरणामध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय (सहपत्र ३ : परिच्छेद २८) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिला होता. त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या परिच्छेद २ मध्ये आहे. तो पुढीलप्रमाणे :-

"That, in between, and in terms of the aforesaid G.R. dated 25.01.1990, the High Court granted relief to **another employee Sanjay Kharbade in Writ Petition No. 1085 of 2004** directing the Respondent-State to de-reserve the post and to give **placement as also consequential benefits to the petitioner therein from the date of his first appointment."**

**८५.** अमरावतीच्या सहसंचालकांनी दिनांक २८ मार्च २००८ रोजी मा.सभापतींच्या दालनात झालेल्या चर्चेप्रमाणे मुंबईहून काढलेले दिनांक २८ मार्च २००८ रोजीचे आदेश (सहपत्र १० : परिच्छेद ७८) हे सुद्धा याचिकाकर्त्यांनी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आणून दिले होते. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये त्याचा सुद्धा स्पष्ट उल्लेख आहे. तो पुढील शब्दात :-

"It appears that vide **communication dated 28.03.2008, Respondent no. 3 issued a letter regarding grant of benefit of continuity of service and other benefits to persons,** like the writ petitioner, upon de-reservation of their posts. According to the writ petitioner, the said letter clearly stated that such

Lecturers **were to be given annual increments and other benefits from the dates of their first appointments."**

**८६.** वेळोवेळी याचिकाकर्त्याने शासनाकडे निवेदने सादर केली व त्यावर अधिकाऱ्यांनी वेळेवर निर्णय घेतला नाही व त्यामुळे न्यायालयात येण्यासाठी याचिकाकर्त्याला विलंब झाला याबद्दल याचिकाकर्त्याला दोष देता येणार नाही असा निष्कर्ष मा.सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाच्या परिच्छेद ७.१ मध्ये नमूद आहे तो पुढील शब्दात :-

"The appellant-original writ petitioner made representations for his grievances and requested to de-reserve the post, which was made in view of the G.R. dated 25.01.1990, it cannot be said that the appellant had slept over his rights. In fact, when the representations were made, it was for the appropriate authority to deal with the same expeditiously. From the material on record and, as per the case of the appellant, in view of the circular dated 28.07.1999 and letter dated 17.04.2001, the employees were restrained from going to Court straightaway, without first seeking the redressal of their grievances by representation to the Government and exhausting the said process."

**८७.** शेवटी मा.सर्वोच्च न्यायालयाने त्यांच्या नेमणुकीच्या पहिल्या दिवसापासून म्हणजे दिनांक १६.१२.१९८९ पासून याचिकाकर्त्यांची सेवा धरून त्यांना सर्व आर्थिक लाभ थकबाकीसह देण्यात यावे असे आदेश परिच्छेद ८ मध्ये पुढीलप्रमाणे पारित केले :-

"It is held that the appellant shall be entitled to the arrears/ monetary benefits from the date of his first appointment i.e. 26.12.1989 and the appellant shall be paid all other consequential benefits accordingly, to be paid within a period of three months from today."

**- प्रा.बी.टी.देशमुख**
*माजी विधान परिषद सदस्य व*
*महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे माजी अध्यक्ष*

---

*राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात दिनांक १ जुलै, २०२४ पासून सुधारणा करण्याबाबत.*

## महाराष्ट्र शासन : वित्त विभाग

*शासन निर्णय क्रमांक : मभवा-१३२४/प्र.क्र.३४/सेवा-९*

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२

**दिनांक : २५ फेब्रुवारी, २०२५**

**वाचा** : भारत सरकार, वित्त मंत्रालय, व्यय विभाग कार्यालयीन ज्ञापन क्रमांक : १/५/२०२४-इ.II (बी), दिनांक २१ ऑक्टोबर, २०२४

### शासननिर्णय

राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र पूर्णकालिक कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय महागाई भत्त्याच्या दरात सुधारणा करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासन असे आदेश देत आहे की, दिनांक १ जुलै, २०२४ पासून ७ व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनसंरचनेतील मूळ वेतनावरील अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५०% वरून ५३% करण्यात यावा. सदर महागाई भत्ता वाढ दिनांक १ जुलै, २०२४ ते दिनांक ३१ जानेवारी, २०२५ या कालावधीतील थकबाकीसह माहे फेब्रुवारी, २०२५ च्या वेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

३. महागाई भत्त्याची रक्कम प्रदान करण्यासंदर्भातील विद्यमान तरतुदी व कार्यपद्धती आहे त्याचप्रकारे यापुढे लागू राहील.

४. यावर होणारा खर्च संबंधित शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते ज्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकून त्याखालील मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखाशीर्षाखालील ज्या उप लेखाशीर्षाखाली त्यांच्या सहाय्यक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची टाकण्यात येतो, त्या उप लेखाशीर्षाखाली हा खर्च खर्ची टाकण्यात यावा.

सदर शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०२२५१५५३३५८४०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(वि.अ.धोत्रे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

PR : (1) P 16 NB 2019 (2) P 140 NB 2019 (3) P 12 NB 2020 (4) P 279 NB 2021 (5) P 100 NB 2022 (6) P 165 NB 2022 (6) P 28 NB 2023 (7) P 116 NB 2023 (8) P 116 NB 2023 (9) P 099 NB 2025

---

*Dearness Relief Increase to 53% on Pension/ Family Pension w.e.f. 1st July, 2024.*

## GOVERNMENT OF MAHARASHTRA
## FINANCE DEPARTMENT

Government Resolution
No.: DRP-2025/CR.05/SER-4
*Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road, Mantralaya, Mumbai 400 032.*

**Date: 28 February,2025.**

**Read** - Government Resolution, Finance Department No.: DRP-2024/C.R 49/SER-4, dated 10.07.2024

### RESOLUTION

Government is pleased to decide that the rate of dearness relief with effect from 1st July, 2024 will be revised from 50% to 53% to the State Government pensioners /family pensioners on their Basic Pension/Family Pension. Revised dearness relief with arrears from 1st July 2024 will be payable in cash with pension / family pension of the month of february 2025.

**2.** It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. the Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

**3.** Government is also pleased to direct that above decision should mutatis mutandis, apply to those pensioners including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Agricultural / Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government colleges to whom the pension scheme is made applicable.

**4.** In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf. Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

**5.** The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

**6.** All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, mutatis mutandis, apply to the dearness relief now sanctioned.

**7.** This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202502281445355705. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**(Manisha Kamte)**
Deputy Secretary to Government of Maharashtra

PR : (1) P 20 NB 2019 (2) P 137 NB 2019 (3) P12 NB 2020 (4) P 281 NB 2021 (5) P 101 NB 2022 (6) P 165 NB 2022 (7) P 27 NB 2023 (8) P 127 NB 2023 (9) P 11 NB 2024 (10) P 099 NB 2025

*अकृषि विद्यापीठामधील अध्यापकांच्या भरती प्रक्रियेमध्ये अधिक पारदर्शकता आणण्यासाठी कार्यपद्धती विहित करण्याबाबत*

# महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग

*शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१*

मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२

**दिनांक : २८ फेब्रुवारी, २०२५**

**वाचा :** (१) भारताचे राजपत्र : असाधारण, भाग III -विभाग ४, युजीसी नोटिफिकेशन दिनांक १८ जुलै २०१८.

(२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय, क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५६/१८/विशि-१, दिनांक ८ मार्च २०१९

(३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शुद्धीपत्र क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५६/१८/विशि-१, दिनांक १० मे २०१९

(४) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२३०९/प्र.क्र.१२८/विशि-१, दिनांक ५ मार्च, २०२४

(५) मा.राज्यपाल यांचे अवर सचिव (शिक्षण), राजभवन यांचे पत्र क्रमांक आरबी/जीइएन-२०२४/सीआर-९२८/इडीएन.५/१८२, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२५

## प्रस्तावना

उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थामधील अध्यापकांकरिता विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शैक्षणिक अर्हता आणि अनुषंगिक बाबी विहित करण्यात येतात. विद्यापीठ अनुदान आयोगाकडून दि. १८ जुलै, २०१८ च्या अधिसूचनेद्वारे उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांकरिता "Minimum qualifications for appointment of teachers and other academic staff in Universities and Colleges and Measures for the maintenance of standards in Higher Education" निश्चित करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेतील तरतुदी उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यात लागू करण्यात आल्या आहेत. उपरोक्त अधिसूचना आणि शासन निर्णयांतील तरतुदी विचारात घेऊन विद्यापीठामधील अध्यापकांची निवड प्रक्रिया राबविण्यात येते. सदर निवड प्रक्रिया अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित व्हावी यासाठी मा.कुलपती तथा राज्यपाल महोदयांच्या कार्यालयाकडून प्राप्त झालेले निर्देश विचारात घेऊन कार्यपद्धती विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासननिर्णय

अकृषि विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेसाठी पुढीलप्रमाणे कार्यपद्धती विहित करण्यात येत आहे :-

(१) विद्यापीठांमधील सहायक प्राध्यापक या पदाच्या मुलाखतीसाठी उमेदवार निवडीचे निकष, संदर्भित दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-दोन मधील तक्ता : ३ अ प्रमाणे विहित करण्यात आले अ आहेत. (GR dt. 08.03.2019 Appendix-II Table : 3A Criteria for Short-listing of Candidates for Interview for the post of Assistant Professors in Universities) सध्याच्या पद्धतीनुसार सदर निकष मुलाखतीकरिता उमेदवारांची निवड करण्यासाठी वापरण्यात येतात. त्यात सुधारणा करून यापुढे उमेदवारांचे शैक्षणिक क्रेडेन्शियल आणि त्यांची मुलाखतीमधील कामगिरी अशा दोन्ही बाबी एकत्रित करून अधिक पारदर्शक, निष्पक्ष आणि संतुलित निवड प्रक्रिया विहित करण्यात येत आहे.

(२) त्यानुसार शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापन या बाबींना ८०% इतके गुण (वेटेज) देण्यात यावे. मुलाखतीमधील कामगिरीसाठी २०% इतके गुण (वेटेज) देण्यात यावे. वरील दोन्ही बाबी एकत्र करून १०० गुणांपैकी प्राप्त गुणांनुसार उमेदवारांची गुणवत्ता यादी निवडीकरिता तयार करण्यात यावी. तसेच एकत्रित १०० गुणांपैकी किमान ५० टक्के गुण प्राप्त केलेल्या उमेदवारांनाच अंतिम निवडीसाठी पात्र समजण्यात यावे.

(३) शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन आणि अध्यापन इत्यादी निकषांच्या आधारे (संदर्भित दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट-दोन मधील तक्ता : ३ अ नुसार) उमेदवारांनी प्राप्त केलेले गुण विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करावेत.

(४) अध्यापन क्षमता अथवा संशोधन प्राविण्य (aptitude) यांचे मूल्यमापन परिसंवाद (seminar) अथवा व्याख्यान प्रात्यक्षिक (lecture in a classroom situation) अथवा अध्यापन आणि संशोधन यामधील नवीनतम तंत्रज्ञान वापरण्याच्या क्षमतेवरील चर्चा या बाबी मुलाखतीच्या टप्प्यावर शक्य तेथे विचारात घ्याव्यात.

(५) निवड समितीच्या सर्व सदस्यांनी मुलाखतीकरिता दिलेल्या गुणांची सरासरी विचारात घेऊन उमेदवाराचे मुलाखतीचे गुण निश्चित करण्यात यावे.

(६) निवड समितीच्या बैठकांचे दृक-श्राव्य चित्रिकरण करण्यात यावे. निवड प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तात्काळ, उपरोक्त दृक-श्राव्य चित्रिकरण, बैठकीला उपस्थित असलेल्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या स्वाक्षरीने सीलबंद करावे.

(७) मुलाखती पूर्ण होताच त्याच दिवशी अथवा दुसऱ्या दिवशी निकाल जाहीर करावा.

(८) वरील सर्व निवड प्रक्रिया सहायक प्राध्यापक पदासहित सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापक पदांच्या निवड प्रक्रियेसाठी लागू राहील.

२. वरील कार्यपद्धतीचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल, या अटीच्या अधीन राहून राज्य विद्यापीठांमधील सध्या सुरू असलेली अध्यापकांची निवड प्रक्रिया पूर्ण करण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे. तसेच, भविष्यात होणारी राज्य विद्यापीठांमधील अध्यापकांच्या निवड प्रक्रियेकरिता याच कार्यपद्धतीचा अवलंब करण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०२२८१३२६३३३८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(प्रताप पां. लुबाळ)**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **EDITOR :** Prof. Vivek S. Deshmukh, Balaji Society, Yavatmal 445 001. **PUBLISHER :** Dr. Prakash Tayade , 55, "Aai" Dr. Punjabrao Deshmukh Colony, Near V.M.V. Campus, Amravati 444 604 Published at NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602. PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. AMT/RNP/78/2024-26 (Uploaded on www.nuta.in on 10.03.2025) Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting **: 15.03.2025**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Shikshak Bhavan, Sant Gadge Baba Amravati University Campus, **Amravati- 444 602.**

-------------------------------------------------

To,..........................................................................

..............................................................................

..............................................................................

..............................................................................